दिनांक 23/08/2021 25/08/2021 पर्यंत कुमारी वैष्णवी उर्फ रोशनी लाइफ केअर हॉस्पिटल रुक्मिणी नगरला भरती होती तिथेच तिचे संक्षयती निधन झाले तीन दिवसाच्या कालावधीत तिच्या कुठल्याही तपासण्या आजार निदान न करता तिला नार्कोटिक इंजेक्शन गोळ्या देण्यात येत होत्या वैष्णवी मृत्यूच्या अंतिम क्षणापर्यंत चालती बोलती होती सर्वत्र रुग्णालय फिरत होती चहा बिस्किट करिता बाहेर जात होती सर्व बाबी सीसीटीव्ही मध्ये आलेल्या आहेत साहिलच्या मृत्यू नंतर वैष्णवी एकुलती एकच मुलगी होती आयुष्यात प्रथमच तिला लाईक केयर हॉस्पिटलला भरती केले होते कारण वैष्णवी ही बिटा थालेसिमिया ची वाहक होती तिला कुठल्याही प्रकारची औषधोपचार चालू नव्हते पंधरा वर्षात मृत्यूपर्यंत ही तिला रक्त दिल्या गेले नाही त्यावेळी संपूर्ण सविस्तर माहिती डॉक्टर तायडे यांना देण्यात आली होती रक्त तपासणीचा आग्रह करण्यात आला होता परंतु त्यांनी सांगितले की वैष्णवी डिसीज रुग्णाप्रमाणे लक्षणे नाहीत दिनांक 23/04/2010 ला संयुक्त परिवाराचे रक्त परीक्षण सिकलशेल च्या आजार संदर्भात वसंतराव शासकीय मेडिकल हॉस्पिटल यवतमाळ मध्ये करण्यात आले त्यामध्ये वैष्णवी ही विटा ट्रेड असल्याचे सिद्ध झाले तसेच तिला मृत्यूच्या अखेरपर्यंत कधीच रक्त लागले नाही दिनांक 23/08/2021 ला मासिक पाळी आली तिची पाठ दुखत होती त्यामुळे प्रथम तिला डॉक्टर इंद्रानील ठाकरे यांचे बाल रुग्णालयात नेले त्यांनी चेक केले दोन गोळ्या दिल्या आम्ही डॉक्टर ठाकरे यांना सांगितले की वैष्णवी एस एफ पॅटर्न आहे व ती मासिक पाळीत आहे वाटल्यास आपण भरती करू शकता त्यांनी डॉक्टर नरेश ताडे यांच्याशी फोनवर संपर्क केला त्यांनी फोनवरून सांगितले की हे दुखणे crisis असू शकते त्यांना लाईक केरला पाठवून द्या वैष्णवीला घेऊन सहा सातच्या मध्यदरम्यान हॉस्पिटल ला पोहोचलो डॉक्टर तायडे हजार नव्हते असिस्टंट ने बीपी ऑक्सिजन वजन तपासून भरती करून घेतले आजार निदान न करताच कुठले परीक्षण व घटक शरीरातील घटक तपासण्या न करता व मृत्यूपर्यंतही केल्या नाहीत त्यानंतर डॉक्टर तायडे यांच्याद्वारे फोनवरूनच असिस्टंटला वैष्णवी करिता औषधे सांगण्यात आले प्रथम बारासे रुपयाचे मागवले गेले तीन इंजेक्शन ट्रामा डोल व दोन इंजेक्शन वोमिकोइंट असे होते हे इंजेक्शन लावल्यानंतर रात्रभर वैष्णवी घामाने चिंब होत होती वारंवार पाणी मागत होती शारीरिक संतुलन बिघडत होते जीव घाबरत आहे अशी ती वारंवार तक्रार करत होते

अनेक वेळा बेड सोडून ती रुग्णालयात फिरत होती वैष्णवीची दुखणे नर्सिंग स्टॉप पहात होता व सांगत होता की आम्ही डॉक्टरांशी फोनवरून विचारूनच औषध देत आहोत डॉक्टर पहाटे नऊला येतील दिनांक 24/08/2021 च्या पहाटे तिला त्रास होत होता नऊ वाजल्यानंतरही डॉक्टर रुग्णालयात आले नाही त्यांच्या व्यतिरिक्त डॉक्टर निलेश चौधरी द्वारा पुन्हा पेन किलर चे इंजेक्शन देण्यात आले व लिहून देण्यात आले त्यामध्ये ट्रामाडोल डायनाफोर व झेरॉडॉल या औषधामुळे पुन्हा पूर्ववत त्रास होत होता ती मासिक पाळीत आहे हे डॉक्टरांना सांगण्यात आले तरी तिचे हिमोग्लोबिन व अन्य घटक तपासण्या जसे की पोटॅशियम सोडियम आयरन शुगर सिरटोनिन इलेक्ट्रो लाईट केएफटी करण्यात आल्यात नाही दिनांक 24/08/2021 च्या दुपारी एक वाजून तीस मिनिटाला प्रत्यक्ष तपासणीस डॉक्टर तायडे आले त्यांनी सांगितले चिंतेची बाब नाही ती दुखणे मनावर घेत आहे तिने आपल्या मोठ्या भावाला गमावले त्यामुळे ती टेन्शन घेत आहे आपण

कॉन्सलिंग करू त्यावेळी माझे लहान भाऊ व पत्नीने त्यांना आग्रह केला की वैष्णवीच्या संपूर्ण तपासण्या व रक्त तपासण्या रिपोर्ट करून घ्या HB तपासून घ्या कारण ती मासिक पाळीत आहे व तिला दिलेल्या औषधानी व होत असलेल्या त्रासाची माहिती दिली ती वारंवार पाणी मागते जीव घाबरतो असे सांगते त्यावेळी डॉक्टर सांगत होते की क्रायसिस मध्ये जास्त पाणी पाजण्याची आवश्यकता असते तरी तिचे डायग्नोसिस व रिपोर्ट करण्यात आले नाही व दुसऱ्या दिवशीचे दुपारी 25/08/2021 पर्यंतचे तीन वाजता पर्यंत डॉक्टर तायडे हॉस्पिटलला आले नाही फोनवरूनच औषध उपचार सांगत होते व २४ तास सेवारात नियोजित वेळेप्रमाणे चे डॉक्टर सुद्धा तिला रेगुलर नार्कोटिक पेनकिलर चे औषधे व इंजेक्शन पुरवठा करीत होते डॉक्टर निलेश चौधरी डॉक्टर नितीन बरडिया डॉक्टर निलेश पंचभुदे डॉक्टर सुशील राजभूत असे सर्वत्र डॉक्टरांनी कुठलेही आजाराचे निदान न करता कुमारीच्या गैर उपस्थित तही औषधांच्या चिट्ट्या स्टॉप कडे देऊन जात होते औषधांचे विपरीत परिणाम स्पष्ट तिच्या शरीरावर दिसत होते त्वचेवर लाल भडक रंगाचे चट्टे व काळसर चट्टे दिसत होते तोंडात फोड आले होते ओठ फाटले होते ती वारंवार तक्रार करायची तरी नियमित रेगुलर नार्कोटिक इंजेक्शन ट्रॉमाडोल व अन्य देण्यात येत होते तोंडात फोड आल्याने दिनांक 24 81 च्या रात्रीपासून तिने जेवण करणे बंद केले होते

दिनांक 25/08/2021 ला पहाटे तिला चांगले वाटत नव्हते त्या क्षेत्रात असलेल्या स्वामी समर्थांच्या देवढा पर्यंत ती तिच्या आईसोबत पायी फिरायला गेली नऊ वाजून तीस मिनिटाला हॉस्पिटलला परत आली तिला भूक लागली होती परंतु तोंडात फोड आले होते तरी भूक भागवण्याकरिता ती नारळ पाणी पिण्याकरिता महाल टेकड़ी वर आली अकरा वाजता ला परत हॉस्पिटलला आली तिची तब्येत बघण्याकरिता यवतमाळ वरून आमचे नातलग आले होते तिच्या मृत्यूपर्यंत हॉस्पिटलमध्ये होते 25/08/2021 अंदाजे तीन वाजता दुसऱ्या फेर तपासणी राउंडवर डॉक्टर नरेश तायडे आले त्यांच्या येण्याच्या एक तास अगोदरच कुमारी वैष्णवी स छोट्या सलाईन द्वारे इंजेक्शन ट्रॉमाडोल 100 टू एम एल व dayक्लोफिनक टॅबलेट  देण्यात आली होती वैष्णवी चे कपडे घामाने चिंब झाल्याने दुपारी दोन वाजता स्वतः बाथरूम मध्ये जाऊन तिने हात पाय धुतले नवीन ड्रेस घातला डॉक्टर रूममध्ये आले माझ्या पत्नीने डॉक्टरांना मेडिसिनचे शरीरावर झालेले विपरीत परिणाम दाखवले व विचारले की कुमारी वैष्णवी चा इलाज आपण स्वतः करत आहात की सर्वत्र हॉस्पिटल मिळून संपूर्ण जीवन काळात एवढी मेडिसिन तिला घ्यावी लागली नाही संपूर्ण शरीरावर लाल काळसर चट्टे पडले की कमजोर झाली त्यावेळी तिच्या डोळ्यावरील पापण्या हटवून मी डॉक्टरांना सांगितले की कुमारीत रक्ताची कमी वाटते डॉक्टर तायडे द्वारा तिचे बीपी चेक करण्यात आले हातांच्या नसांना दाबून दाबून मात्र चार थेंब रक्त क्रॉस मॅच संम्पल करिता काढण्यात आले त्यावेळी तिच्या शरीरातून रक्तच निघत नव्हते तिला पीआयसीयू मध्ये बोलावले ती स्वतःच पीआयसीयू मध्ये चालत व बोलत गेली मला तात्काळ इंजेक्शन ट्रॉमाडोल आणण्यास सांगितले व वैष्णवीच्या हाताच्या नस मध्ये इंजेक्शन लावण्यात आले इंजेक्शन लावतात तिचा श्वास थांबला छातीवर डॉक्टरांनी कॉम्प्रेशन केले अनेक यांत्रिक उपकरणे लावण्यात आले डॉक्टरांनी फाईल बघितली लगेच पुन्हा बारा ते चौदा इंजेक्शन बोलवण्यात आले मला तात्काळ रक्त आणण्यास सांगितले मी बालाजी ब्लड बँकेत पोहोचतात नातेवाईकांनी फोन केला की रक्त मिळाले नसेल तरी तुम्ही

लगेच हॉस्पिटलला परत या कारण की वैष्णवीच्या मुखातून रक्त वाहत आहे प्राणांतिक पिळामुळे तिने संपूर्ण ताकतीने बेडवर पायांच्या जोर लावला पायाच्या पंजा वाकडा झाला तिची हालचाल बंद झाली मी लगेच वीस मिनिटात रक्त घेऊन परत आलो डॉक्टरांनी रक्त देण्याचा प्रयत्न केला मात्र शरीरात रक्त जात नव्हते ती मृत्यू झाली होती पंधरा ते वीस मिनिटे अगोदर ती स्वतःच्या पायावर चालत बोलत पीआयसीयू मध्ये गेली होती त्यावेळी मेडिकलचा मी बिल भरणा करू नहीं मला बिले देण्यात आले नाहीत इलाजाचे दस्तावेज चिठ्ठ्या मी सतत मागत होतो त्यांनी प्रचंड पोलीस त्यावेळेला बोलावून घेतले होते

आम्ही स्वतः त्यांना कागदपत्र मागत होते व डॉक्टर आम्हास सांगत होते की सर्व कागदपत्र पोलिसांना सोपवण्यात आले तेथून प्राप्त करा रात्री आठ वाजता ला आम्ही पोलीस स्टेशन राजापेठ ला सर्व नातलग पोहोचलो रात्री दोन वाजून तीस मिनिटे पर्यंत तक्रार नोंदवण्यात आली तक्रार अर्जावर त्यामुळे दिनांक 26/08/2021 अशी झाली पोलिसांना आम्ही कागदपत्र मागितले ते म्हणाले आम्ही डॉक्टर नाहीत डॉक्टरांना मागा आम्ही त्यांना एफ आर करण्याची विनंती केली त्यांनी सांगितले की जोपर्यंत पोस्टमार्टम रिझल्ट येत नाही तोपर्यंत एफ आर होणार नाही झिरो झिरो मध्ये त्यांनी नोंद करून घेतली आम्ही पोलीस स्टेशनला असता आमच्या गैरहजर परस्पर कुमारीचे शव जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या मुर्दा घरात लॉकअप केले त्यामुळे पीएम तिथे घेण्यात आम्ही विवष झालो आम्ही पीएम ला बॉडी अन्यत्र नेत होतो परस्पर बॉडी का उचलली असे पत्रात आम्ही डॉक्टर नरेश तायडे यांना कालांतराने विचारले असता डॉक्टर तायडे यांच्या लिखित पत्राप्रमाणे की ही बॉडी आम्ही न उचलता पोलिसांनी त्यांच्या कायद्याप्रमाणे उचलली असे पत्र त्यांचे प्राप्त आहे दिनांक 26/08/2021 ला संक्षयती मृत्यू बाबतचे पत्र माननीय जिल्हा अधिकारी माननीय उपविभागीय अधिकारी अमरावती माननीय शैल्य चिकित्सक अधिकारी अमरावती माननीय पोलीस स्टेशन राजापेठ ला देऊन पीएम लाईव्ह शर्तीवर घेण्यात आला विशेरा संरक्षित करून तात्काळ फॉरेन्सिकची मागणी केली पीएम झाल्यानंतर जिल्हा सामान्य रुग्णालयाचे उच्च अधिकारी डॉक्टर यांनी सांगितले की हार्ड क्लिअर आहे स्पेलिंग सव्वा पाच इंच आहे लिव्हर फ्लोट आहे व मूत्रपिंडावर इन्स्पेक्शन आहे तीन दिवसात पीएम रिपोर्ट आपण येथे येऊन प्राप्त करावा आम्ही अनेक चक्रावर मारल्या तरी पीएम आम्हास देण्यात येत नव्हता शेवटी 11/10/2021 च्या सकाळी आम्ही एसडीओ कार्यालय अचलपूरच्या समोर अन्न त्या आंदोलनावर बसलो मागणी फक्त मरण पावलेल्या दोन्ही मुलांचे दस्तावेज सीसीटी फुटेज मेडिकलचे बिले विसरा रिपोर्ट घटना समय राज्यमंत्री श्री बच्चुभाऊ कडू आले तक्रार लक्षात घेतली 18/10/2021 रोजी विश्राम भवन अमरावतीला दोन्ही रुग्णालयाचे डॉक्टर शैल्य चिकित्स अधिकारी व स्वतः राज्यमंत्री व माझे नातलग त्या बैठकीत होते त्यामध्ये दोन दिवसात सर्वत्र मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन माननीय शैलेचिकित्सक अधिकारी यांनी दिले त्यानंतरही चार महिने ११ दिवस पोस्टमार्टम रिपोर्ट प्रतीची गोपनीयता बाळगल्या गेली त्यानंतर आम्ही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना तक्रारी दिल्या नंतर दिनांक 07/01/2021 ला पोलीस स्टेशन परतवाड्याचे दोन अधिकारी आमच्या घरी पीएम कॉपी घेऊन आले त्यामध्ये ओपिनियन रिझर्व होते ते आज पर्यंतच आहे व विसरा फॉरेन्सिक लॅब अमरावतीला असता तो यवतमाळला पाठवण्यात आला असे पत्र माननीय पोलीस स्टेशन परतवाडा चे आहे यवतमाळला विशेरा परीक्षण व डी आणि परीक्षण होत नाही असे

त्यांचे पत्र प्राप्त आहे तसेच विसेरा अमरावती नागपूर मुंबई पुणे औरंगाबाद नाशिक कुठल्याच फॉरेन्सिक सायन्स लॅबला पाठवण्यात आलेला नाही मृत्यूचे सत्य कारण लपवण्यात आले आहे पुन्हा बॉडी खोदून फॉरेनसिक व डीएनए डायग्नोसिस व्हावे कारण वर्ष 2014 मध्ये कुमारी वैष्णवी ला सिकल्चर कॉन्सलर द्वारे सिकलसेल डीसी चे कार्ड घरपोच दिले हे कार्ड जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावतीतूनही प्राप्त झाले परंतु साहिल व वैष्णवीला हे दोन्ही सिकलसेल नहोते साहिल हा थलेसिमिया होता व वैष्णवी बीटा ट्रेड होती वैष्णवी मृत्यूपर्यंत कुठल्या शासकीय अशासकीय रुग्णालयात रक्त घेण्यास भरती झाली नाही तिला कधीच रक्त दिले नाही असे बोगस कार्ड किती लोकांना वाटले व त्यातून त्यांचा बडी गेला सखोल तपास व्हावा याच कार्डाच्या नेमका फायदा घेऊन शैल्य चिकित्सक अधिकारी व लाइफ केअर हॉस्पिटल च्या संगणमतातून विशेरा विकृती विभाग यवतमाळला 45 दिवसाने पोलीस स्टेशन परतवाडा तर्फे पाठवला असे प्राप्त पत्र आमच्याकडे आहे जेणेकरून रिपोर्ट सोयीस्कर रिपोर्ट तयार करून प्रकरण दाबल्या जाईल व सिकलसेल गुंतागुंतीचा आजार दर्शवून डॉक्टरांची सुटका केल्या जाईल तसेच घडले दिनांक 04/02/2022 चे पोलीस स्टेशन परतवाडा चे पत्र